जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -८० दिनांक -०१/०२/२०२५**

गुन्हे शाखा, युनिट-०४ पुणे शहर

## मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय करवुन घेणा-या ०४ आरोपीवर गुन्हा दाखल करुन केली ०९ पिडीत मुलींची सुटका

दि.१/०१/२०२५ रोजी गोपनिय बातमीदारामार्फतीने मुरकुटे प्लाझा औंध पुणे येथे मसाज स्पा सेंटरचे नावाखाली वेश्याव्यवसाय करिता मुली ठेवुन त्यांना पुरुष गि-हाईकांना मसाजच्या नावाखाली पुरवुन त्यांचेकडुन वेश्याव्यवसाय करवुन घेत असलेबाबत खात्रीशिर बातमी प्राप्त झाली.

सदर बातमी प्रमाणे खात्री करुन कारवाई करणेबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.अजय वाघमारे यांनी आदेशीत केल्याने त्याप्रमाणे बनावट गि-हाईकास पाठवुन खात्री करुन छापा टाकुन पाहिजे आरोपी १) स्पा मालक २) मॅनेजर ३) कॅशियर व ४) मॅनेजमेट करणारा रिकबुल हुसेन आबुल हुसेन वय २६ वर्षे, रा. सदर ठिकाणी, मुळ बेरबेरी रोड, जामा मस्जित, जमुना मुख, जि. नागांव, राज्य आसाम यास ताब्यात घेतले व त्यांचे ताब्यातील ०९ महिला त्यापैकी **०४ महाराष्ट्र राज्य, ०१ गुजराज राज्य, ०४ थायलंड देशातील महिला,**यांची सुटका केली.त्यांचेकडे अधिक चौकशी करता ते मसाज सेंटरमध्ये मसाजचे नावाखाली स्वतःच्या आर्थिक फायदया करीता कामासाठी येणाऱ्या महिलेंकडुन जबरदस्तीने वेश्यागमन करवुन घेत होते. त्याप्रमाणे आरोपीविरुध्द चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं.६७/२०२५ अनैतिक मानवी वाहतुक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १४३,३(५) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी ही मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे, पुणे श्री निखिल पिंगळे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-२, श्री, राजेंद्र मुळीक यांचे मार्गदर्शनाखाली युनिट-४,चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अजय वाघमारे, व चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री विजयानंद पाटील यांचे सुचनेप्रमाणे सहा.पोलीस निरीक्षक,नरेंद्र पाटील,पोलीस उप निरीक्षक, वैभव मगदुम व गुन्हे शाखा युनिट-४, पथक व चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनकडील स्टाफने कारवाई केली आहे.